(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 108 | विशिष्ट खेळातील सामान्य हिंसा डॉ. उदय दा. मेंडुलकर | 464 |
| 109 | स्त्रि श्रमिकांचे शोषण : कार्ल मार्कसचा दृष्टिकोण प्रा. वनिता चोरे | 469 |
| 110 | भारतीय समाज व स्त्रीमुक्ती शैलेश देविदास जनबंधु | 474 |
| 111 | स्त्री सक्षमीकरण व संरक्षण प्रा. रमेश सुखदेवराव आगलावे | 477 |
| 112 | घरगुती हिंसा – कारणे, परिणाम व उपाययोजनाएक समाजशास्त्रीय अध्ययन प्रा. संदीप रायबोले | 481 |
| 113 | ''कौटुंबिक हिंसेवर संगीत एक उपाय'' प्रा. अशोक एस. जाधव | 486 |
| 114 | अहिंसात्मक श्रमसंस्कृती प्रा.रविंद्र बा. शेंडे | 489 |
| 115 | पुरुषी मानसिकता आणि कौटुंबिक हिंसाचार विठ्ठल सदाशिव चौधरी | 493 |
| 116 | पुरुषप्रधान व्यवस्था आणि घरगुती हिंसाचार डॉ. पार्वती विनायक माने | 497 |
| 117 | कौटुंबिक हिंसाचार समाज आणि कायदा प्रा. राजू बुरीले | 500 |
| 118 | कौटुंबिक हिंसाचार व स्त्रियांचे मानवी अधिकार सहा. प्रा. राहुल ज. जोधळे | 506 |
| 119 | कौटुंबिक हिंसाचाराबद्दल सरकारची धोरणे सहा. प्रा. राहुल आर. लव्हाळे | 510 |
| 120 | महिलांच्या संदर्भात मानवी अधिकार आणि हिंसाचार प्रा. सतोष मारोतराव रामटेके | 514 |
| 121 | कौटुंबिक हिंसाचार कारणे व उपाय डॉ. उल्हास रामजी राठोड | 518 |
| 122 | स्त्री आणि कौटुंबिक हिसाचार सहा.प्रा.संदीप एस.उप्पोड | 521 |
| 123 | भारतीय महिलांची कृषी क्षेत्रातील भूमिका व समस्या प्रा.डॉ. किशोर मो. ढुमणे | 524 |
| 124 | भारत में महिला और घरेलू हिंसा कानून प्रा. अनिलकुमार हनुमानदास गुप्ता | 526 |
| 125 | भारतीय समाजातील कौटुंबिक अत्याचार प्रा. डॉ. ज्ञानेश्वर टी. शेन्डे | 530 |
| 126 | 'महिलांवरील अत्याचार व आद्य भारतीय समाजसुधारक' प्रा. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण | 538 |
| 127 | घरगुती हिंसाचार : कारणे व उपाययोजना डॉ. नलीनी आय. बोरकर | 542 |
| 128 | कौटुंबिक हिंसाचार: भारतातील सद्यस्थिती डॉ. राहुल भगत | 548 |
| 129 | वर्तमान संस्कृती आणि कौटूंबिक हिंसाचार डॉ. रमेश एम. घोनमोडे | 555 |
| 130 | महिला सशक्तीकरण डॉ. स्मिता दि. जोशी | 560 |




Scanned by CamScanner

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

# 'महिलांवरील अत्याचार व आद्य भारतीय समाजसुधारक'

प्रा. डॉ. मोतीराज रामदास चव्हाण
सहाय्यक प्राध्यापक भिवापूर महाविद्यालय, भिवापूर जि. नागपूर

सारांश:

'लिखित इतिहासात' अनुल्लेखित राहिलेले व 'घडलेल्या' इतिहासात दडलेले स्त्रीविषयक वास्तव शोधणे, नामवंत स्त्रियश्चरित्रांची भाग्यदायी कहाणी कथन करणे, स्त्रियांचा विविध घडामोडी वा स्थित्यंतरांमधील सहभाग अधोरेखित करणे या गोष्टी महत्वाच्या खऱ्या, पण त्यांच्या निव्वळ गोळाबेरजेतून स्त्रीवादी इतिहास सिध्द होत नाही. ऐतिहासीक वास्तवाच्या लिंगभावमयतेचा संशोधकीय पायावरील अन्वयार्थ हा स्त्रीवादी इतिहास–लेखनाचा खरा गाभा म्हणता येईल. मानवी इतिहासाच्या आकलनासाठी प्रदेश,वंश,धर्म,जात,वर्ग इ. जे विविध प्रवर्ग लक्षात घेतले जातात, त्यांत दुर्लक्षित राहिलेल्या 'लिंगभाव' या प्रवर्गावर भर देऊन इतिहास–लेखन करणारा प्रवाह म्हणजे स्त्रीवादी प्रवाह होय. या लिंगभावातूनच महिलावरील अत्याचार वाढलेले आहे हे प्रकर्षाने जाणवते. महिलावरील अत्याचार हा अनेक वर्षापासून चालत आलेला आहे. हा अत्याचार दुर सारण्याचा प्रयत्न हा भारतीय समाजसुधारकांच्या माध्यमातून बऱ्याच अंशी दुर झाल्याचे दिसतो. परंतु मनुष्यस्वभाव एकाएकी बदलत नाही त्यांचा काही अंश आजही मनुष्यामध्ये अस्तित्वात असल्यांचे जाणवते. त्यामुळे आजही महिलावरील अत्याचार हे संपूर्णपणे दुर झाल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तावना:

'सबाल्टर्न स्टडीज' तथा वंचिताचा अभ्यास' हा इतिहास–लेखनातील आणखी एक नवा प्रवाह आहे. ' तळाकडून इतिहास' असेही त्याचे वर्णन केले जाते. लोकसंख्येच्या निम्म्याने तरी असणाऱ्या स्त्रियांवर पुरूषशाहीने हरप्रकारे वंचितावस्था लादली. त्यामुळे स्त्रीविषयक कोणताही इतिहास हा 'तळाकडून इतिहास' म्हणून संबोधता येईल. मात्र स्त्रियांमध्येसुध्दा स्तरीकरण आढळते आणि स्तरांनुसार स्त्रियांचे कमी–अधिक प्रमाणातील शोषण सदैव होत आलेले आहे.

भारतीय महिलांच्या अगतिक, दयनीय परिस्थितीचा आढावा हे प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक कालखंडानुसार केलेला आहे.

प्राचीन कालखंडातील स्त्रियांचे स्थान:

भारतीय इतिहासाची सुरूवात ही वैदिक काळापासून होते. वैदिक काळी समाजात स्त्रियांना मान असे व त्यांना गौरवपूर्णस्थान प्राप्त झाले होते. पुरूषांप्रमाणे स्त्रियांही सर्व संस्कारास अधिकारी मानल्या जात. किंबहुना स्त्रियांना पतीसमवेत व त्यांच्या गैरहजेरीत अनेक धर्मकृत्ये हे श्रेष्ठ स्थान प्राप्त झाले होते,ह्याचे कारण तत्कालीन शिक्षणपध्दतीत होते अध्ययनाबाबत,स्त्रीपुरूषात मुळीच भेद केला जात नसे. म्हणूनच त्याकाळात अनेक स्त्रियांनी तत्वज्ञ, शिक्षक व वादविवाद पटू म्हणून नावे गाजवली. त्यात गार्गी, वाचकवनी मैत्रेयी,सुलभा,घोषा,लोपामुद्रा इ. स्त्रियांचा समावेश होतो. ऋग्वेदातील अनेक ऋचा स्त्रियांनी रचलेल्या आहेत. त्या अध्यापन करण्याइतक्या विद्यापारंगत असत. त्या काळात बालविवाह प्रचलित नव्हते. मुली पूर्ण वयात आल्यानंतर त्यांचे विवाह होत. त्याकाळची गृहिणी सुखी होती. कुटुंबात तिचा योग्य मान राखला जाई. ती खऱ्या अर्थाने पतीची सहचारिणी होती. विधवांबाबत तत्कालीन समाजाचा दृष्टिकोण उदारमतवादी होता. विधवा स्त्री पुनर्विवाह करू शके व विवाह न करता, चिरकाल,ब्रम्हचर्य पाळून राहणाऱ्या स्त्रियांकडे समाज आधुनिक काळाप्रमाणे उपहासाने व वाईट दृष्टीने पाहत नसे. किंबहुना आपल्या मुली चांगल्या



Scanned by CamScanner

पंडित निघाव्यात व त्या ब्रम्हवादिनी असाव्यात म्हणून मातापिता त्यांच्यासाठी परमेश्वराची आराधना करीत असत. स्त्रियांना वैदिक समाजात सन्मानाने वागविले जाई. व त्यांच्याकडे उदार दृष्टिकोनातून पाहिले जाई. स्त्री ही घरची सम्राज्ञी आहे. हा वैदिक संस्कृतीचा आदर्श होता.

मनुस्मृतीतील स्त्रियांबाबतचे अनुदार उल्लेख सर्वश्रुत आहेत. उत्तरवैदिक काळात मनूने स्त्रीचे रक्षण बालपणी पिता, तारूण्यात पती, वृध्दपणी पुत्र करीत असतो असे म्हंटले आहे. कारण पुरूषांपेक्षा ती शारीरिक दृष्टीने केव्हाही उणी ही असणारच. हेच भाव याज्ञवल्क्य मध्येसुध्दा दिसून येते. रक्षेत् कन्यां पिता, निन्नां पति पुत्रास्तु वार्धक्ये, अभावे ज्ञतयस्तेषां न स्वातंत्रय कवचित् स्त्रिया परंतु 'न स्त्री स्वातंत्र्यम् मर्हति' असा मूळ विचार सोडून केलेला प्रचार गैरसमज निर्माण करतो. असा गैरसमज अनेकांच्या मनात आजही घर करून आहे. लोक स्त्रीजातीची घृणा करतात 'माता' हया भूमिकेला सर्वोच्च स्थान दिले आहे. माता ही गुरूची देवता मानली आहे. स्त्रियांचे आर्थिक हक्क व सवलती याबाबतीत अत्यंत अभिमानास्पद व उज्ज्वल प्रकारची प्रगती स्मृतीकाळात झालेली दिसून येते.

इ.स. पूर्व पाचव्या व सहाव्या शतकात भारतात प्रसृत झालेल्या जैन व बौध्द धर्मीयांची स्त्रीबाबतची भूमिका, वैदिक काळाइतकी नसली तरी बऱ्याच अंशी समतेची व आदराची होती.

**मध्ययुगीन कालखंडातील स्त्रियांचे स्थानः**

सुमारे आठव्या शतकानंतरच्या हजार वर्षांच्या दीर्घ कालावधीत सर्वसामान्य स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा व अधिकारांचा संकोच होण्याची प्रक्रिया सुरू राहिली. समाजात जसजसे नवे व्यवसाय सुरू झाले, जातीप्रथा रूढ होत गेली, तसतसे पुरूषांचे बाहेरचे कार्यक्षेत्र विस्तारत गेले आणि स्त्रियांना गौणस्थान दिले जाऊ लागले. याच कालखंडात वायव्येकडून झालेल्या मुस्लिम आक्रमणामुळे व त्याबरोबरच होणाऱ्या नागरिकांवरील हल्ल्यांमुळे व लूटमारीमुळे जनजीवन अस्थिर व असुरक्षित झाल्यामुळे प्रथम उत्तर भारतात आणि नंतर दक्षिण भारतात स्त्रियांच्या सुरक्षिततेची समस्या निर्माण झाली. मुस्लिम आक्रमणानंतर स्त्रियांच्या अधोगतीला सुरूवात झाली. स्त्रीकडे मनुष्य म्हणून पाहिले जात नव्हते. तर एखाद्या उपभोग्य वस्तू प्रमाणे तिच्याकडे पाहिले जाऊ लागले. तिला कोणतेही अधिकार प्राप्त नव्हते. समाजात मुक्तपणे संचार करण्याचे तिचे स्वातंत्र्य हया काळात हिरावून घेतले गेले. भारतात स्त्रियांच्या सुरक्षिततेची समस्या निर्माण झाली. तिचे निराकरण करण्यासाठी भारतात तेराव्या शतकापासून पडदापध्दती सुरू झाली. मुलीच्या विवाहाचे वय सुध्दा कमी करण्यात येऊन बालविवाहाची रूढी पक्की झाली. त्यामुळे मुलींचे शिक्षण खुंटले. त्याचा परिणाम होऊन स्त्रीला योग्यायोग्य निर्णय करताच येत नाही. म्हणून तिने पुरूषांच्या आज्ञेत रहावे असे सांगण्यात आले. ज्ञानार्जनाचा त्यांचा मार्ग अवरूध्द झाल्यामुळे धार्मिक क्षेत्रात व्रतवैकल्ये, बाहय उपचार हा त्यांच्या जीवनाचा आधार बनला. पती निधनानंतर 'सती प्रथा रूढझाली. सती जाण्याने स्त्री पतीस सर्व पापापासून मुक्त करते. असा समज होता. पण इ.स. १२०० नंतर जेव्हा मुस्लिम शासक भारतात आले तेव्हा तर सती जाणे आवश्यक होऊ लागले. कारण पती निधनानंतर स्त्रीला सांभाळणे कठीण होऊ लागले व ती प्रथा अधिकच रूढझाली. याच काळात वधुपित्याने वरास द्यावयाची हुंडयाची चाल रूढझाली. या चालीचा स्त्रीच्या समाजातील स्थानावर परिणाम झाला समाज अधिक रूढीवादी झाल्यामुळे तत्कालीन स्त्रियांचा समाजातील दर्जा घसरत गेला. स्त्रिया या पुरूषवर्चस्वाखालीच असत. स्त्रीचे जीवन तत्कालीन कालखंडात एकूण विचार करता, त्या समाजस्थितीप्रमाणे गतानुगतिकच होते.

**आधुनिक कालखंडातील स्त्रियांचे स्थानः**

१९ व्या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रातील स्त्री—जीवन हे मध्ययुगीन सरंजामी चौकटीत बंदिस्त झालेले होते. एकीकडे ' यत्र नार्यस्तु पूजन्ते'... तर दुसरीकडे ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति...'



Scanned by CamScanner

अशी विसंगत मनुवादी वृत्ती हे भारतीय समाजमानसाचे पारंपारिक वैशिष्ट्य होते. महाराष्ट्रही त्याला अपवाद नव्हाता. माता आणि पतिव्रता या भूमिकांत स्त्रीचा गौरव करायचा, तिला देव्हाऱ्यात बसवायचे; पण या देव्हाऱ्याचाच तुरूंग बनवायचा, ही गतानुगतिक चलाखी अद्यापही संपलेली नव्हती. चूल आणि मूल यांमध्ये स्त्री –जीवन बंदिस्त होते. मुलीच्या जन्माबाबत स्वागतशीलतेचा अभाव, बालिकाहत्याची समस्या , स्त्री–शिक्षणाला बंदी, बाल–विवाह, जरठ–बालाविवाह, सतीप्रथा, केशवन, विधवा–विवाह–बंदी , इ. विविध समस्यांनी स्त्री–जीवन ग्रसत झालेले होते. वरील सर्व परिस्थितीचे निरीक्षण करून, स्त्रियांवर अन्याय होतो आणि स्त्रियांना त्यांचे न्याय्य हक्क आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे ही जाणीव काही समाजसुधारकांना होऊ लागली.

महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकाच्या अखेरीस इंग्रजी राजवट सुरू झाल्यानंतर अल्पावधीतच येथे वैचारिक जागृतीची लक्षणे दिसून येऊ लागली. इंग्रजी शासनाद्वारा तसेच पाश्चात्य शिक्षणाद्वारा संपन्न व प्रगतीशील पाश्चात्य संस्कृतीशी महाराष्ट्राचा परिचय झाला. विशेषत: १८२७ साली एलफिस्टन विद्यालयाची मुंबई येथे स्थापना झाल्यानंतर येथून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या तरूणांना पाश्चात्य साहित्यातून पाश्चात्यांचे आधुनिक विचार, समाजसंस्था, त्यांचा इतिहास, नानाविध विज्ञानशाखा यांची माहिती झाली.

**आद्य समाजसुधारकाची भूमिका:**

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्री ही उपभोग्य वस्तू बनली होती. किंबहुना आगरकरांनी वर्णन केल्याप्रमाणे 'प्रजाजननयंत्र' म्हणून स्त्रीकडे पाहिले जात होते. ब्रिटिश अमलांखाली व भारतीय प्रबोधनाच्या परिणामस्वरूप 'स्त्री–जन्माची ही करूण कहाणी' बदलण्यास प्रारंभ झाला.

पती निधनानंतर स्त्रियांना सती जाण्याची पाशवी चाल बंद व्हावी हया दृष्टीने राजाराम मोहन रॉय यांनी प्रयत्न सुरू केले व त्या प्रयत्नांना यश येऊन लॉर्ड बेंटिकने १८२९ मध्ये सतीच्या चाल कायदयाने बंद केली. स्त्रीला व्यक्ती म्हणूनच स्वतंत्र अस्तित्व संपले की स्त्रीने सती जाऊन,आपले जीवन क्रूर मार्गाने संपविण्याची गरज नाही. पतीच्यामृत्युनंतर ती जगू शकते. समाजाचा ती एक घटक आहे. तिलाही पुरूषाप्रमाणेच जिवंत राहण्याचा अधिकार आहे. म्हणून स्त्रीदास्यविमोचन झाले पाहिजे. यासाठी राजाराम मोहन रॉय यांनी फार प्रयत्न केले.

त्यानंतर भारतातील सामाजिक गुलामगिरीच्या विरूध्द बंड पुकारणारे समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले हया फार मोठया क्रांतीकारकाला, भारतात स्त्री शिक्षणाकडे फार दुर्लक्ष होत असल्याचे बघून वाईट वाटले, आणि स्त्री शिक्षणाचे कार्य करण्याचे त्यांनी ठरविले. स्त्रीला शिक्षण दिले तर ती कुमार्गाला लागेल व घरादाराचे वाटोळे होईल, तिला अकाली वैधव्य येते, असे मानले जाई. अशा सर्व पार्श्वभूमीवर ज्योतिबांनी स्त्रीशिक्षणासाठी फार मोठे कार्य केले. आपली पत्नी सावित्रीबाई हयांना त्यांनी शिकविले. सावित्रीबाईचा शाळेत जाता–येता फार छळ होत असे. असे असूनही सावित्रीबाई आपले काम नेटाने व निष्ठेने करीत. महात्मा ज्योतिबा फुल्यांच्या स्त्रीजीवनासाठी केलेल्या कार्यमुळे स्त्रीजीवनात फार मोठे परिवर्तन झाले. म्हणूनच त्यांना स्त्री शिक्षणाचे आद्यजनक असा मान मिळाला.

ज्योतिबांप्रमाणेच महर्षी दयानंद सरस्वती, पंडिता रमाबाई, भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे ताराबाई शिंदे, बाबा पदमनजी,विष्णूशास्त्री पंडीत, रा.गो. भांडारकर, बहरामजी मलबारी इ. अनेक समाजसुधारकांनी स्त्रीदास्य विमोचनाचे फार मोठे कार्य केले.

विसाव्या शतकाच्या दृष्टीने विचार केला तर सामाजिक जीवनात आज बरेच परिवर्तन झालेले दिसते. स्वातंत्र्यपूर्व काळात महात्मा गांधींच्या प्रेरणेने स्त्रियांचा राजकारणात प्रवेश झाला. स्वातंत्र्यसमरात महिलाही पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून लढल्या. स्वदेशी आणि परक्या मालावरील बहिष्काराच्या चळवळीत स्त्रियांनी भाग घेतला. प्रसंगी त्यांनी तुरूगांवासही सोसला.



Scanned by CamScanner

ISSN : 2278-9308
March 2020

स्वतंत्र्यानंतर औद्योगीकरणाचा वेग वाढला. खेडयांचे शहरीकरण झाले. त्याचा एकूणच परिणाम भारतातील समाजजीवनावर झाला. तसेच स्त्रीजीवनावरही त्याचे फार सखोल परिणाम झाले. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या कल्याणाच्या आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक कायदे केले गेले. हया कायद्यांमुळे महिलांना पुरूषांसारखे समान अधिकार मिळाले आहेत. तर काही कायदे महिलांवरील अत्याचार थांबविण्यासाठी झाले आहेत. याअगोदर केवळ महिलांच्या संदर्भात कायदे केले गेले. उदा. सतीबंदी कायदा १८२९, विधवा पुनर्विवाह कायदा, १८५६, हिंदू विवाह कायदा १९५५, हुंडा प्रतिबंधक कायदा १९६१ इत्यादी

निष्कर्ष: आतापर्यंतच्या विवेचनावरून असे म्हणता येईल की, १९ व्या शतकातील महाराष्ट्रात स्त्रियांची स्थिती आणि त्यातही बहुजन स्त्रियांची स्थिती अत्यंत असमाधानकारक होती. तिच्यामध्ये बदल घडवण्याचे व्यक्तिगत, संस्थात्मक व शासकीय प्रयत्न घडू लागले. पण त्यांना मध्यमवर्गीय,उच्चवर्णीय व पुरूषशाही मर्यादा पडलेल्या होत्या. काही कायदे झाले, काही सुधारणांना चालना मिळाली, काही स्त्रियांची व्यक्तिगत स्थिती बदलली. परंतु लिंगभेदाचे पारंपरिक मनोवास्तव त्यामुळे फारसे बदलले नाही. मात्र त्या बदलाच्या पूर्वतयारीसंदर्भात १९ व्या शतकातील घडामोडींचे महत्व विसरून चालणार नाही.

उपाययोजना:भारतातील बहुसंख्य लोकसंख्या दारिद्रयात राहते. त्यामध्ये महिलांचे प्रमाण जास्त आहे. सामाजिक विषमता निर्मूलन, सूक्ष्म आर्थिक धोरणे आणि गरिबी निर्मूलनाचे कार्यक्रम यांमधून महिलांच्या समस्या सोडविण्यास अग्रक्रम दिला पाहिजे. गरीब महिलांचे संघटन करण्यासाठी पावले उचलली गेली पाहिजेत. दारिद्रयरेषेखालील महिलांना सहजपणे कर्जे उपलब्ध करून देण्यासाठी आर्थिक संस्था व बॅंका यांचा विस्तार केला गेला पाहिजे. सामाजिक व आर्थिक विकासामध्ये महिलांचे योगदान असले पाहिजे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेतून निर्माण झालेल्या नकारात्मक सामाजिक आणि आर्थिक परिणामांना सामोरे जाण्यासाठी महिलांचे सक्षमीकरण केले पाहिजे. भारतीय समाजात दीर्घ काळापासून स्त्रियांना अपमानित केले आहे. खूप वर्षे स्त्रिया ह्या शोषणाच्या शिकार झाल्या आहेत. हे शोषण कुठेतरी थांबणे आवश्यक आहे. त्यामुळे फक्त कायदे करून चालत नाही तर त्या कायद्यांची अमंलबजावणी काटेकोरपणे राबविणे आवश्यक आहे.

**संदर्भसूची**

१. Altekar A. s. The Position of Women in Hindu Civilization ,Publication House, Banaras Hindu University , banaras_ 1938.
२. Ranjit Guha ,SubalternStudies] Vol.s I to IX , New Delhi, 1982-96.
३. श्रीवास्तव सुधारानी,श्रीवास्तव आशा, महिला शोषण और मानवाधिकार ,अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दरियागंज नई दिल्ली २०१०.
४. पवार वैशाली,महिलांच्या सत्तासंघर्षाचा आलेख,डायमंड पब्लिकेशन्स,सदाशिव पेठ पुणे, २०१२.
५. पाठक दमयंती, भारताच्या स्वातंत्र्यलढयात वैदर्भीय महिलांचे योगदान,श्री मंगेश प्रकाशन, नवी रामदास पेठ, नागपूर, २००३.



Scanned by CamScanner